# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर
## बैलांचा/जनावरांचा बंद लिफाफा जाहीर लिलाव
## वर्षे २०२५–२६

## जनावरांचा बंद लिफाफा जाहीर लिलाव

मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर, येथिल विविध विभागातील पशुधनाची उदा. बैल (जनावरांची) विक्री बंद लिफाफा जाहीर लिलावाने **दिनांकः– १०.०२.२०२६ रोजी ११** वाजता, मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापुर कार्यालय परीसर येथे करण्यात येईल लिलावाच्या अटी शर्ती, व अन्य माहिती दिनांक :– ०६.०२.२०२६ पासून विद्यापीठ संकेतस्थळ **www. pdkv.ac.in** वर उपलब्ध आहे. तसेच या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत जनावरे पहावयास मिळतील तरी इच्छूकांनी लिलावात सहभाग घेण्यापूर्वी जनावरांची पाहणी करावी व बंद लिफाफा दि. ०८/०२/२०२६ ते १०/०२/२०२६ (सकाळी ११.०० वाजे पर्यंत) कार्यालयीन वेळेत सादर करावे.

**लिलावाचे स्थळ** : मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर कार्यालय परिसर.

मुख्य बिजोत्पादन अधिकारी
म.प्रा.प्र.वणी रंभापूर

## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
## मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापुर
## बैलांचा/जनावरांचा बंद लिफाफा लिलाव पध्दतीने विक्रीचे अटी व शर्ती खालील प्रमाणे

१) बैल/जनावरे म.प्रा.प्र. अंतर्गत येत असलेल्या वणी, पहाडपुर, राजापुर, सुकळी व तामशी प्रक्षेत्राच्या विभागावर असल्यामुळे लीलाव धारकांनी लिलाव तारखेच्या दोन दिवस अगोदर/लिलावाआधी आपल्या सोईनुसार प्रस्तावित प्रक्षेत्रावर पाहणी करुन घेण्यात यावी.त्यानुसार बंद लिफाफात विभागनिहाय बैलांच्या/जनावरांच्या संख्यानुसार स्वतंत्रपणे रक्कम दर्शविण्यात यावी.

२) बैलांच्या/जनावरांच्या जाहीर लिलाव करण्यासाठी लिलाव धारकांनी बंद लिफाफा पध्दतीने निवीदा प्रपत्रामध्ये भरणे बंधनकारक आहे.

३) लिंलावात सहभागी होणाऱ्या लिलावधारकाला ज्या ठिकाणे जनावरे आहेत त्या ठिकाणची पाहणी केल्यावर लिलाव सुरु होण्यापुर्वी लिलावची बोली बोलणेसाठी रोख रक्कम रू. २५,०००/— (अक्षरी रू. पंचविस हजार रू. फक्त) भरणा अनामत रक्कम म्हणुन भरावा लागेल. त्या नंतरच लिलावा मध्ये सहभागी होता येईल. त्याच प्रमाणे सबंधीतांनी पुरविण्यात येणाऱ्या प्रपत्रात माहिती भरावी लागेल. लिलावाच्या वेळेस स्वखर्चाने उपस्थीत राहावे लागणार.

४) म.प्रा.प्र.अंतर्गत निवीदा विभागातील प्रक्षेत्रावर बैल/जनावरे ज्या परिस्थितीत लिलावा करीता आहे. त्या परिस्थितीत रितसर लिलाव प्रक्रियेव्दारे लिफाफा बंद पध्दतीने असल्यामुळे सदर लिलावात सहभागी होणाऱ्या लिलावधारकाने सर्व अटी व शर्ती वाचुन समजून विभागनिहाय बोली रक्कम लिफाफा बंद करुन घेणे अनिवार्य आहे.

५) लिलावातील जास्तीत जास्त बोली स्वीकृत करणे अथवा न करणे तसेच शासकिय किमतीपेक्षा बंद लिफाफ्यातील किंमत कमी असल्यास संबंधीत जनावरे देण्याचा अथवा न देण्याचा सर्व अधिकार लिलाव समितीस राहील त्याशिवाय लिलावात इतर बाबतीत लिलाव समिती अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

**६) जनावरांचा बंद लिफाफा लिलाव करणे किंवा रद्द करण्याचा अधिकार मुख बिजोत्पादन अधिकारी यांनीं राखुन ठेवला आहे.**

७) ज्या लिलाव धारकाची बोली मंजुर झालेली आहे त्यांनी कार्यालयीन वेळेतच स्वखर्चाने जनावरे घेऊन जावी लागेल. शासकिय सुट्टीच्या दिवशी जनावरे घेवून जावू नये.

८) एकदा बंद लिफाफा लिलावात घेतलेले जनावरे कोणत्याही सबबीखाली परत घेतल्या जाणार नाही संबंधीत बोली धारकाने जनावरांचा ताबा न घेतल्यास अमानत रक्कम जप्त करुन विद्यापीठात जमा करण्यात येईल.

९) बंद लिफाफा लिलाव समितीच्या कामकाजामध्ये अडथळा आणणे आरडाओरड करणे किंवा दखल देणाऱ्यास लिलावातुन बाद करण्यात येईल व त्याची अमानत रक्कम जप्त करण्यात येईल.

१०) बंद लिफाफा लिलावात लिलावधारकाची सर्वात जास्त रक्कम आल्यास सदरहु जनावरे ताब्यात घेण्यापुर्वी ती जनावरे शेतीकामाकरीता/पाळण्याकरीता विकत घेत असुन कत्तलीसाठी वापरणार नाही असे लेखी हमीपत्र रुपये ५००/— चे स्टॅप पेपरवर लिहुन देणे बंधनकारक राहील.

११) बंद लिफाफा लिलावात विकत घेतलेले जनावरे लिलवधारकाने लिलावाच्या दिवशी न नेल्यास रुपये ३००/- प्रति जनावरे प्रति दिवस खावटी म्हणून विभागातच जमा करावी लागेल अन्यथा सदरहु लिलाव धारकाची रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच सदरहु जनावरांची सहा महीणे पर्यंत पाहणी करण्यात येईल.

१२) समीती समक्ष लिफाफाबंद असलेले उघडल्यानंतर ज्या लिलावधारकाची सर्वात जास्त बोली असतील त्या लिवाधारकाची बोली सर्व कार्यालयीन प्रक्रिया करून विभागनिहाय सर्वात जास्त बोली रक्कम निश्चीत करून सर्वानुमते मान्य केल्या जाईल

१३) जनावरांची संख्या म.प्रा.प्र. अंतर्गत विविध प्रक्षेत्रावर असल्यामुळे विभागनिहाय लिफाफाबंद मध्ये स्वतंत्रपणे जनावरांच्या संख्येनुसार एकत्रीत किंमत भरावे लागेल व त्यानुसार प्रत्येक विभागाची वेगवेगळी बोली रक्कम नुसार ज्या लिलावधारकाची बोली रक्कम सर्वात जास्त असतील त्या लिलावधारकास विभागनिहाय जनावरे घेवून जाण्याकरीता सर्व कार्यालयीन प्रक्रिया करून मंजुरी प्रधान केल्या जाईल.

१४) ज्या विभागावर जनावरे उपलब्ध आहे त्यानुसार लिलावात सहभाग घेण्यापुर्वी दोन दिवसात स्वखर्चाने सविस्तर बघुन शहानिशा करावे. व जनावरांचे संख्येनुसार बंद लिफाफा लिलावकरण्याकरीता बंद लिफाफा पध्दतीने दि. ८/२/२०२६ ते दि. १०/०२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजे पर्यंतच कार्यातयात स्विकारण्यात येईल, व त्यानुसार निविदाधारकाने नांव नोंदणी करावी तसेच अमानत रक्कम भरण्यात यावी त्याप्रमाणे लिलावधारकाचे बंद लिफाफा लगेच त्याच दिवशी (दि. १०/२/२०२६) सकाळी ११ वाजता सर्वाच्या समक्ष उघडण्यात येईल.

१५) बंद लिफाफा लिलावाचे स्थळ :– मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र,वणी रंभापुर कार्यालयाचे परिसर

मुख्य विजोत्पादन अधिकारी
मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र,
वणी रंभापुर

रक्कम जमा ३०.

# प्रपत्र

## मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, डॉ.पं.दे.कृ.वि. वणी रंभापुर

## बंद लिफाफा मध्ये भरावयाची माहिती

| अ.क्र | विभागाचे नाव | बैलांचा/जनावरांचा संख्या | किंमत (रु) |
|---|---|---|---|
| १ | राजापुर विभाग म.प्रा.प्र. वणी रंभापुर | ०३ | |
| २ | सुकळी विभाग म.प्रा.प्र. वणी रंभापुर | ०४ | |
| ३ | पहाडपुर विभाग म.प्रा.प्र. वणी रंभापुर | ०२ | |
| ४ | वणी विभाग म.प्रा.प्र. वणी रंभापुर | ०१ | |
| ५ | तामशी विभाग म.प्रा.प्र. वणी रंभापुर | ०३ | |
| एकुण | | १३ | |

टिप:— बंद लिफाफामध्ये रक्कम/किंमत भरण्यापूर्वी अटी व शर्तीचे अवलोकन करावे.

लिलाव धारकाचे स्वाक्षरी व पत्ता

सही :—

नाव :—............................................

पत्ता :— ............................................

............................................

आधारकार्ड क्र. :— ................................

मोबाईल क्र. :— ...................................